

# स्वर्गाची सहल

लीलावती भागवत

NEHRU BAL PUSTAKALAYA





रु. 12.00 ISBN 81-237-3688-0

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

नेहरू बाल पुस्तकालय

# स्वर्गाची सहल
## व अन्य कहाण्या

लीलावती भागवत

चित्रे
जतिन दास

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया



ISBN 81-237-3688-6

पहिली आवृत्ती : 1970 *(शके 1892)*
तिसरी आवृत्ती : 1990 *(शके 1912)*
चौथी आवृत्ती : 1991 *(शके 1913)*
पाचवी आवृत्ती : 1992 *(शके 1914)*
सहावी आवृत्ती : 2002 *(शके 1923)*
सातवी आवृत्ती : 2003 *(शके 1924)*

© लीलावती भागवत, 1970

A Trip To Heaven *(Marathi)*

**रु. 12.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.

# स्वर्गाची सहल

एका गावात एक माळी राहात असे. त्याचे आपल्या बागेवर फार प्रेम. सकाळसंध्याकाळ बागेत काम करी. झाडांना पाणी घाली. झाडांच्या बुडाशी असलेली माती साफ करी. नको असलेले, उगीच वाढलेले गवत उपटून टाकी. आणि हे सगळे काम झाले तरी रात्रीसुद्‌धा झाडाफुलांची राखण करण्यासाठी बऱ्याच उशिरापर्यंत बागेत थांबे.

एकदा तो असाच बागेची राखण करीत बसला होता. तेव्हा त्याला काही-तरी खुसखूस ऐकायला आली. जेथून आवाज आला तिकडे जाऊन त्याने पाहयले तर काय आश्चर्य! एक भला थोरला पांढराशुभ्र हत्ती बागेत शिरून एका झाडाची फळे सोंडेने काढून घेऊन खात होता. प्रथम माळीदादाला रागच आला. पण त्याने जरा निरखून बघितल्यावर त्याच्या एकदम लक्षात आले की हा साधासुधा हत्ती नाही. हा स्वर्गातला हत्ती, इंद्राचा ऐरावत असावा. लहानपणी आजीने सांगितलेली गोष्ट त्याला आठवली. आजी म्हणाली होती, "बरं का पोरांनो, इंद्राचा पांढराशुभ्र हत्ती ऐरावत कधीकधी स्वर्गाचा कंटाळा आला की पृथ्वीवर येतो उतरून."

माळीदादाला खूप आनंद झाला. आजीने त्याला आणखीही सांगितले होते की "स्वर्ग खूप छान असतो." त्याच्या मनात आले, "अनायासे ऐरावत





आपल्या बागेत उतरला आहे. तेव्हा त्याच्या शेपटीला धरूनच आपण स्वर्गात का जाऊ नये ?"

आणि मग बागेतली फळे ऐरावताने पोटभर खल्ली तरी माळीदादा रागावला नाही. त्याचे जेवण आटपेपर्यंत थांबला. ऐरावताने रात्रभर खाऊन एक मोठ्ठी ढेकर दिली आणि उजाडताच तो आता परत जाण्याच्या तयारीत आहे असे बघितल्याबरोबर माळीदादाने पकडली त्याची शेपूट. घट्ट हातात धरून ठेवली आणि ऐरावताबरोबर स्वर्गात जाऊन पोहोचला.

ऐरावत अलगद स्वर्गातल्या एका बागेत उतरला. माळीदादा पायाला जमीन लागल्याबरोबर ऐरावताची शेपूट सोडून उभा राहिला. त्याला थोडी चक्कर आल्यासारखे झाले. पण लगेच सावरला आणि बघतो तर काय ?

तो एका बागेत उभा होता. ते नंदनवन असावे. इंद्राच्या बागेचे हे नाव त्याला माहीत होते आणि तो डोळे फाडफाडून बघू लागला. बापरे. केवढया मोठ्या या वस्तू ! प्रत्येक वस्तू पृथ्वीवरच्या वस्तूच्या दसपट मोठी. पाने, फुले सगळे सगळे दसपट. तो बागेत खूप हिंडला. दिवसभर फळे तोडून खाल्ली. एका सफरचंदानेच त्याचे पोट भरले. तरी दुसरे खाल्ले. त्यानेही मोठ्ठी ढेकर दिली.

आता रात्र पडायला आली होती. माळीदादाला घरची, त्याच्या बायकोची, लक्ष्मीची आठवण झाली. तो म्हणाला. "माझ्या लक्ष्मीसाठी काहीतरी भेट न्यायला हवी स्वर्गातून."

मग त्याने एक सुपारी घेतली—नारळायेवढी आणि एक विडयाचे पान घेतले—केळीच्या पानायेवढे. रात्र पडली तशी ऐरावताच्या शेपटीला धरून





तो बसला. ऐरावत उडाला पृथ्वीच्या दिशेने आणि अलगद माळीदादाच्या बागेत उतरला. माळीदादाही त्याच्याबरोबर आला आपल्या बागेत.

पण आज ऐरावताने त्याच्या बागेतली सगळी फळे खाल्ली असती तरी त्याला चिंता नव्हती. तो राखण करायला बसणारच नव्हता. बागेत उतरल्या-बरोबर तो तडक निघाला आणि आपल्या घरी गेला.

लक्ष्मी त्याची वाट पाहून पाहून दमली होती. तो आल्याबरोबर रागावून म्हणाली, "कुठे गेला होतात काल रात्रीपासून? मी कंटाळले वाट बघून."

माळीदादा म्हणाला, "हे पाहा, उगीच रागावू नकोस. तुझ्यासाठी बघ मी काय छान भेट आणली आहे." आणि त्याने ती नारळायेवढी सुपारी आणि केळीच्या पानायेवढे विड्याचे पान तिला दाखवले.

"अग्गोबाई, केवढी ही सुपारी! केवढं हे पान? कुठून अणालंत?"

"स्वर्गातून." माळीदादाने सांगितले. पण लक्ष्मीचा विश्वास बसेना. मग माळीदादाने तिला ऐरावत कसा बागेत उतरला, आपण त्याच्या शेपटीला धरून स्वर्गात कसे गेलो, तिथून ही फळे कशी आणली ते सगळे सांगितले. फळे तिच्यासमोरच होती. त्यामुळे तिला मग खरे वाटले. माळीदादाने तिला बजावले, "हे बघ, हे कुणाला सांगू नकोस हं. लक्षात ठेव. बोलायचं नाही कुणाजवळ."

लक्ष्मी म्हणाली. "मी काही वेडी नाही कुणाला सांगायला."

माळीदादा रोज स्वर्गात जायचा. रोज नवी वस्तू घेऊन यायचा. लक्ष्मीने एक दिवस, दोन दिवस वाट बघितली. ती गप्प बसली. पण मग तिसऱ्या दिवशी तिला हे कुणाला तरी सांगितल्याशिवाय राहवेना. मग तिसऱ्या दिवशी ती आपल्या अगदी प्रिय मैत्रिणीकडे गेली आणि तिने तिला हे सांगितले. मग तिला जरा बरे वाटले पण तिने मैत्रिणीला बजावले, "हे बघ तू माझी अगदी प्रिय मैत्रीण म्हणून मी तुला हे गुपित सांगितलं आहे. वचन दे, कुणाला सांगणार नाही म्हणून." मैत्रीण म्हणाली, "छे: वेडी की काय मी कुणाला सांगायला ?"

पण लक्ष्मी घरी गेली आणि मैत्रिणीला दम निघेना. तिने विचार केला, "मी फक्त माझ्या खास मैत्रिणीला सांगेन आणि तिला मात्र बजावीन की दुसऱ्या कुणाला सांगू नकोस."

मग तिने आपल्या खास मैत्रिणीला, तिने तिच्या खास मैत्रिणीला, तिने तिच्या खास मैत्रिणीला, अशी ही साखळी पसरतच गेली. या सगळ्या बायकांनी फक्त आपल्या नवऱ्यांना सांगितले आणि मग काय ? सगळ्या गावाला माळीदादाच्या स्वर्ग सफरीची बातमी समजली. सगळी लोकं त्याच्या घराकडे धावली. माळीदादा लक्ष्मीला खूप रागावला. पण काय करणार ? सगळे गाव त्याच्याजवळ हट्ट धरून बसले की "आम्हांलाही पण स्वर्गात न्या. आम्हांलाही मोठ्ठ्या वस्तू आणायच्या आहेत."

बिचारा माळीदादा, काय करणार ? अगदी मनाविरुद्ध त्याने सर्वांना न्यायचे कबूल केले. तो म्हणाला, "आज रात्री माझ्या बागेत जमा, सगळे. मी तुम्हांला घेऊन जाईन."



मग रात्री सगळे बागेत जमले. रोजच्याप्रमाणे ऐरावत बागेत उतरला. तो परत जायला निघाला तेव्हा माळीदादाने त्याची शेपटी पकडली. लक्ष्मीने माळीदादाच्या कंबरेला धरले. तिच्या मैत्रिणीने लक्ष्मीला धरले. मैत्रिणीला तिच्या नवऱ्याने, नवऱ्याला दुसऱ्या मैत्रिणीच्या नवऱ्याने, त्याला दुसऱ्या मैत्रिणीने, तिला तिच्या मैत्रिणीने, मैत्रिणीला तिच्या नवऱ्याने....नवऱ्याला.... आणि अशी ही साखळी वाढतच गेली. ऐरावत अलगद वर उडाला. सगळी त्याच्याबरोबर जमिनीपासून वर उडत आकाशातून स्वर्गाकडे जाऊ लागली.

जाता जाता वाटेत साखळीतल्या शेवटच्या बाईला वाटले, "खरंच केवढी असतील ही फळं ?" कारण माळीदादाने किंवा लक्ष्मीने त्यांना फक्त सांगितले होते वर्णन करून, फळे दाखवली नव्हती.

मग त्या बाईला काही राहवेना. तिने आपल्या नवऱ्याला विचारले, त्याने पुढच्याला, त्याने आपल्या बायकोला, तिने आपल्या मैत्रिणीला विचारले. होता होता–हा प्रश्न पोहोचला लक्ष्मीपर्यंत. लक्ष्मीने माळीदादाला विचारले. "अहो माझी मैत्रीण विचारते आहे की फळांचा आकार केवढा होता ?"

माळीदादा म्हणाला, "खूप मोठ्ठा !" पण मैत्रिणीचे समाधान होईना. तेव्हा लक्ष्मी म्हणाली, "माझी मैत्रीण म्हणतेय नक्की केवढा ?"

माळीदादा म्हणाला, "सांगितलं ना खूप मोठा ? आता तेथे गेल्यावर दिसेलच. जरा थांबा."

पण मैत्रिणीला आपली उत्सुकता काही दाबून ठेवता येईना. ती लक्ष्मीला सारखी विचारू लागली. मग लक्ष्मी माळीदादाला पुन्हा पुन्हा आग्रह करू लागली.

"अहो सांगा ना पण नक्की केवढा ?"

आता मात्र माळीदादा चिडला. त्याने एकदम दोन्ही हात पसरून म्हटले "हा....हा येवढा."

आणि एकदम—धडाड—धूम....

त्याने हात पसरल्याबरोबर त्याच्या हातातून ऐरावताची शेपटी निसटली आणि ही सगळीच्या सगळी मानवी साखळी धाडकन् पृथ्वीवर आपटली.



## अमोल भेट

एक अत्यंत प्रजाहितदक्ष राजा होता. आपल्या राज्यातल्या कुणाही व्यक्तीला काही दुःख असू नये अशी त्याची इच्छा असे आणि आपल्याला खरेखुरे काय ते कळावे यासाठी तो वेष पालटून राज्यात सगळीकडे हिंडत असे. ही त्याची नेहमीची सवय होती.

असाच हिंडत असताना एक दिवस एक आश्चर्यकारक दृश्य त्याच्या नजरेस पडले. एक शेतकरी आपल्या शेतात नांगरणी करीत होता. नांगरणी खूप जोरात चालली होती. पण शेतकऱ्याने नांगराला बैलांऐवजी आपल्या बायकोला जुंपली होती.

राजाला हे पाहून फार राग आला. तो त्या शेतकऱ्याजवळ जाऊन म्हणाला, "काय रे, ही काय शेत नांगरायची पद्धत झाली ? बैलांऐवजी या बाईला नांगराला जुंपायला लाज वाटत नाही तुला ?"

शेतकरी म्हणाला, "काय करणार बाबा, आम्ही गरीब माणसं. संसाराचा खर्च भागेना म्हणून मला माझे बैल विकावे लागले. पण शेत तर पिकवायला हवं. म्हणून आम्हांला स्वतःलाच ही कामं करणं भाग आहे."

पण राजाचे काही या उत्तराने समाधान झाले नाही. तो म्हणाला, "माझी या गोष्टीला हरकत आहे. बाई म्हणजे काही ओझ्याचा बैल नव्हे. चल,

सोडव माझ्या या बहिणीला नांगरापासून. मी तुला बैल विकत घेण्यापुरते पैसे देतो."

शेतकरी रागावून म्हणाला, "अरे वा रे वा. तू कोण हरकत घेणारा? आणि तुझ्याजवळून पैसे घ्यायला आम्ही काही भिकारी नाही."

"अरे पण माझ्या बहिणीला असं...." राजा पुन्हा तक्रारीच्या सुरात म्हणाला, आता मात्र शेतकरी थोड्या उपहासाने म्हणाला,

"अहो राजश्री, तुम्हांला जर आपल्या बहिणीच्या प्रेमाचा येवढा पुळका आला आहे तर स्वतःलाच का नाही तिच्या जागी नांगराला जुंपून घेत? आता मोकळी करतो तुमच्या बहिणीला."

राजाने तावडतोब ते आव्हान स्वीकारले. शेतकऱ्याच्या बायकोच्याऐवजी त्याने स्वतःला नांगराला जुंपून घेतले. शेतकऱ्याच्या बायकोने जरा मोकळेपणी सुटकेचा निःश्वास टाकला. पण राजाला या असल्या कष्टांच्या कामाची सवय होती थोडीच? त्यामुळे नांगरणी चांगली झाली नाही आणि त्यामुळे जेव्हा पिकाची मळणी झाली तेव्हा असे आढळून आले की राजाने शेताची जेवढी पट्टी नांगरली होती तेवढ्या पट्टीतल्या पिकाला खुरटलेली कणसे धरली होती.

ती कणसे पाहिल्याबरोबर शेतकरी आपल्या बायकोला म्हाणाला, "बघ, बघ, तुझा तो भाऊ म्हणवणारा माणूस. किती अंगचोरपणाने नांगरलीन जमीन. बघ कशी खुरटलेली कणसं आली आहेत."

पण काय आश्चर्य? कापणी झाली तेव्हा शेतकऱ्याचा आणि त्याच्या बायकोचा आनंद मनात मावेना; कारण त्या छोट्या खुरटलेल्या कणसांत दाण्याऐवजी टप्पोरे मोती पिकले होते.

शेतकरीण म्हणाली, "पाहयलंत. माझ्या भावाला नावं ठेवलीत ना? पण त्यानेच हे मोत्यांचं पीक दिलं."



शेतकरी म्हणाला, "खरं आहे. ही मोत्ये तुझ्या त्या भावाच्याच मालकीची आहेत. ती आपण त्याला नेऊन देऊ."

शेतकरीण म्हणाली, "अहो, पण तो सापडणार कुठे तुम्हाला? वाटेचा वाटसरू आला. मला बहीण मानून शेत नांगरून गेला. ना त्याचं नाव माहीत ना ठावठिकाणा. शोधणार कसा त्याला आणि मोत्ये त्याला देणार कशी नेऊन?"

शेतकरी जरा विचारात पडला. पण मग काहीतरी सुचून म्हणाला. "खरं आहे तू म्हणतेस ते. पण ही मोती काही आपल्या मालकीची नाहीत. तो

भाऊ सापडला नाही तर यावर मालकी राजाची. आपण ही राजाच्या ताब्यात देऊन टाकू या."

शेतकरणीला नवऱ्याचे म्हणणे पटले. "हो, हो. असंच करू या. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे आपण हे मोती राजालाच नेऊन देऊ या."

मग शेतकऱ्याने त्या मोत्यांचे गाठोडे बांधले आणि गेला राजाच्या राजवाड्यात. पहारेकऱ्याला म्हणाला, "मला राजेसाहेबांना भेटायचं आहे."

राजाकडे कुणालाही जायची बंदी नव्हती. राजा दरबारात बसला होता. शेतकरी आणि शेतकरीण दोघे ते मोत्यांचे गाठोडे घेऊन दरबारात गेले. सिंहासनावर राजा बसला होता. त्याला ते गाठोडे देण्यासाठी त्यांनी त्याच्याकडे पाहिले. आणि बापरे! त्या दोघांनी राजाला ताबडतोब ओळखले.

"म्हणजे? मी राजालाच नांगराला जुंपलं? आता भरली शंभर वर्षं. आता राजा चांगलीच शिक्षा करणार मला." राजाला पण शेतकऱ्याची ओळख पटली. शेतकरी राजाच्या पायावर लोळण घेत म्हणाला,

"महाराज, फार मोठा गुन्हा घडला आहे माझ्या हातून. मी आपल्याला तेव्हा ओळखलं नाही, आता ओळखलं. आपल्याला कष्ट दिल्याबद्दल क्षमा करा."

राजा हसून म्हणाला, "अरे क्षमा कसली मागतोस? उलट मला एक संधी मिळाली प्रजेचं दुःख थोडं तरी दूर करण्याची."

शेतकऱ्याने मोत्यांचे गाठोडे राजापुढे ठेवून म्हटले, "महाराज, आपण नांगरलेल्या शेताच्या पट्टीला ही मोत्यांची कणसं धरली होती. हे मोती आपल्याच मालकीचे आहेत. हे ठेवून घ्या."

राजा म्हणाला, "हे बघ, हे मोती तुझ्या शेतात पिकले आहेत तेव्हा ते तुझे आणि तुझ्या बायकोच्या मालकीचे आहेत. तुम्ही दोघं फार कष्टाळू आणि प्रामाणिक आहांत. तेव्हा हे देवाचं देणं समजून तुमच्या गुणांचं बक्षीस म्हणून घ्या."



पण शेतकरी निश्चयाने म्हणाला, "नाही महाराज. हे आपलेच आहेत. आपल्या कष्टाचं आणि सहानुभूतीचं, दयेचं हे बक्षीस आहे. हे आपणच घेतलं पाहिजे."

शेतकऱ्याचा हट्ट पाहून राजाने ते मोत्यांचे गाठोडे हाती घेतले. सिंहासनावरून उतरून तो खाली आला. त्याने ते गाठोडे शेतकरणीच्या हाती देत म्हटले,

"मी एकदा तुला बहीण मानलं. आता त्याच नात्याने तुला ही भाऊबीज घालीत आहे. भावाची ही प्रेमाची भेट स्वीकार."

यावर शेतकऱ्याला नाही म्हणता येईना. त्याने ते मोती घेतले आणि आपल्या दयाळू, प्रेमळ, प्रजाहितदक्ष राजाचा निरोप घेऊन ती दोघे घरी परत आली.



## दोन व्यापारी

कोणे एके काळी वाराणशी शहरात दोन व्यापारी राहात होते. एक होता हुशार आणि विचारी. नेमक्या वेळी नेमकी तीच गोष्ट करण्यामुळे तो खूप श्रीमंत झाला होता. दुसरा होता दीडशहाणा. म्हणजे काय की तो स्वतःला शहाणा समजत असे, पण खरे पाहता तो मूर्ख होता.

एक दिवस शहाण्या व्यापाऱ्याने दुसऱ्या शहरी व्यापारासाठी जायचे ठरवले. त्याने खूप मौल्यवान आणि वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू खरेदी केल्या आणि पाचशे बैलगाड्यांमध्ये त्या भरल्या. दुसऱ्या व्यापाऱ्याला ते समजल्याबरोबर तो मनात म्हणाला, "ठीक आहे. मीही असंच करतो आणि त्याला हरवून टाकतो या व्यापारात."

त्याच्याजवळ पैसे नव्हते. पण त्याने खूप मोठ्ठे कर्ज काढले आणि शहाण्या व्यापाऱ्याने घेतल्या होत्या तशाच सगळ्या वस्तू खरेदी करून त्या पाचशे बैलगाड्यांवर रचल्या. अर्थात बैलगाड्याही त्याच्या नव्हत्याच. त्याही उसन्या मागून आणलेल्या.

शहाण्या माणसाला ही दीडशहाण्याची तयारी समजली. त्याला जरा काळजी वाटू लागली. म्हणून मग त्याने त्या व्यापाऱ्याला बोलावणे पाठवले आणि त्याला तो म्हणाला, "मित्रा, असं पाहा, आपल्याला दोघांना एकाच रस्त्यानं जायचं असेल तर वेगवेगळं जायला हवं. कारण रस्ता इतका खराब आहे की हजार बैलगाड्यांचं ओझं त्याला सहन होणार नाही. शिवाय आपण

त्या खेडयातल्या माणसांवरच जेवणाखाण्याच्या, राहण्याच्या व्यवस्थेसाठी अवलंबून असतो. इतक्या सर्वांची व्यवस्था करणं त्या मंडळींनाही कठीण जाइल. तेव्हा आपण बरोबर जाता कामा नये. तेव्हा तुला आधी जायचं आहे की तू माझ्या मागून येणार ?"


मूर्खाला वाटले, "बरं झालं याने मला हे विचारलं. मीच आधी जाईन म्हणजे मला रस्ता चांगला मिळेल. माझ्या बैलांना चांगलं ताजं गवत मिळेल, गावकरी माझ्या माणसांना आधी चांगलं चुंगलं देतील, आणि मी जेव्हा त्या शहरामध्ये पोहोचेन तेव्हा माझाच माल प्रथम बाजारात मांडला जाईल."

शहाण्या माणसाच्या मनातही असाच विचार आला. पण त्याने त्यावर विचार केला तेव्हा त्याने वेगळाच निर्णय घेतला.

आणि म्हणूनच जेव्हा मूर्ख म्हणला. "मी आधी जाणार" तेव्हा त्याने मुळीच आढेवेढे न घेता त्याला संमती दिली.

आपल्या पाचशे बैलगाड्यांच्या ताफ्याबरोबर मूर्खाचा प्रवास सुरू झाला. तो आनंदाने गाणे गात होता. लौकरच हाती येणाऱ्या संपत्तीच्या विचाराने खूप खुश झाला होता.

पण त्याने आपलं शहर सोडले न सोडले तोच त्याला लगेच पहिला धक्का बसला. रस्ता फारच खराब होता, वाटेत दगडधोंडे पडले होते. पावलापावलांवर होते खाचखळगे. आता गाड्या पुढे जायच्या म्हणजे हे दगडधोंडे आणि खाचखळगे दूर करायला हवेत. रस्ता दुरुस्तीचे काम म्हणजे फारच कष्टाचे. पण ते करायला तर हवेच. त्यामुळे ते करता करताच त्या सगळ्या माणसांचा उत्साह संपला आणि वेळ कितीतरी फुकट गेला. गावकऱ्यांनी त्यांना मदत केली



पण काम झाल्यावर त्यांनाच जेवण दयावे लागले. म्हणजे या मूर्खाला त्यांच्याकडून अन्न मिळण्याऐवजी स्वतःजवळचेच त्यांना दयावे लागले.

"काही असो," तो दीडशहाणा म्हणाला, "आता माझ्या गाड्या जायला रस्ता तर मोकळा झाला." पण ते खरे नव्हते कारण नव्या बांधलेल्या रस्त्यावरून गाडया खडखडत गेल्यानंतर एका जंगलात शिरल्या. जंगल इतके दाट होते की गाडयांना वाट करून देण्यासाठी त्या मंडळींना झाडे तोडावी लागली. झाडे तोडली खरी पण त्या जंगलात खूप क्रूर श्वापदे होती. त्यांनी त्यांच्यावर हल्ला करून त्यांचे कितीतरी बैल मारून खाल्ले.

आता तो मूर्ख व्यापारी आणि त्याची माणसे सगळीच खूप थकली, निरुत्साह झाली.

"आपण परत जाऊया," सगळी कुरकुरू लागली, पण व्यापाऱ्याचे समोरच्या रस्त्याकडे लक्ष गेले. तो म्हणाला, "मला तिकडून एक गाडी येताना दिसते आहे. पुढचा रस्ता कसा आहे ते आपण त्या गाडीवानाला विचारू या. उगीच घाईघाईने निर्णय घ्यायला नको."

लौकरच समोरच्या दिशेने गाडी आली. खूप मोठ्ठी गाडी, तिला पांढरे बैल जोडलेले. फारच प्रेक्षणीय होती ती आणि व्यापाऱ्याला आश्चर्य वाटले ते आणखी एका गोष्टीचे, कारण गाडीवान आणि त्याच्याबरोबरची मंडळी ओलीचिंब झालेली होती आणि त्यांनी गळ्यांत पांढऱ्या कमळांच्या माळा घातल्या होत्या.

"महाराज," व्यापारी म्हणाला, "आपण आता ज्या प्रदेशातून आलांत त्याबद्दल काही सांगू शकाल का? तिथे खायला अन्न आणि प्यायला पाणी आहे का?"

"अर्थातच, भरपूर आहे." गाडीवान म्हणाला,

"आमचे हे ओलेचिंब कपडे तुम्हांला दिसत नाहीत? आमच्या गाडयांची चाकं चिखलानं माखलेली तुम्ही पाहचली नाहीत? आम्ही आलो त्या प्रदेशात मुसळधार पाऊस पडत होता आणि शेते तर पिकांनी भरपूर फुलली आहेत."

तेवढयात त्याने त्या व्यापाऱ्याच्या ताफ्याबरोबर असलेले पाण्याचे रांजण बघितले आणि खोः खोः हसत तो म्हणाला,

तुम्ही हे येवढं, पाणी कशासाठी घेऊन जात आहात? तुमच्या बैलांची



कंबरडी मोडतील या वजनानं आणि शिवाय ते निष्कारणच. मी जर तुमच्याजागी असतो तर मी हे सगळं पाणी, गवत, भाजीपाला सगळं फेकून दिलं असतं."

"गाडीवानाचं म्हणणं बरोबरच आहे." व्यापारी म्हणाला आणि त्याने आपल्या माणसांना आपल्याबरोबरचे पाणी, अन्न आणि गवत फेकून दयायला सांगितले.

पाठीवरचे ओझे कमी झाल्याबरोबर काही वेळ बैलगाडया अगदी जलद खुळखुळत धावल्या. आता कोणत्याही क्षणी हिरवी हिरवी शेते दिसतील अशा कल्पनेने व्यापारी हुरळून गेला होता. पण तो क्षण आलाच नाही. त्या उलट पुढचा प्रदेश जास्त रूक्षच होत गेला. आणि लौकरच गाडयांचा हा ताफा एका वैराण कोरडया वाळवंटात पोहोचला.

यांना वाटेत भेटलेली ती अनोळखी माणसे म्हणजे यक्ष होते. त्यांनी जे सांगितले ते साफ खोटे होते आणि आतासुद्धा आपण या मूर्खांना कसे फसवले म्हणून ते दुष्ट यक्ष खुशीत येऊन स्वतःशीच हसत होते.

खायला अन्न नाही, प्यायला पाणी नाही अशा अवस्थेत वाटेतच कितीतरी बैल आणि माणसे मेली आणि उरलेली कशीबशी ढकलत रस्ता चालत होती. आता यक्ष धावत उडया मारीत धाडधाड येऊन थडकले. त्यांनी बैलांना मारून त्यांचे मांस खाल्ले. माणसांना सुद्धा त्यांनी सोडले नाही. तो मूर्ख व्यापारी आणि त्याचे काही साथीदार हाती लागेल ती चीजवस्तू कशीबशी बरोबर घेऊन पळाले म्हणूनच वाचले.

दमलेले, थकलेले, अशक्त झालेले ते एका शहरात पोहोचले. जवळच्या थोडयाशा वस्तू त्यांनी विकल्या. पण त्यांना बाजाराची माहिती नव्हती. कारण त्यांचे ते अवतार, फाटके कपडे सगळे पाहून त्या गावच्या व्यापाऱ्यांनी त्यांच्या मालाची फारच थोडी किंमत दिली. तो मूर्ख व्यापारी आपल्या गावी परत आला. फार निराश होऊन.

"चांगला धडा शिकला तो," शहाणा माणूस म्हणाला. तो आपला ताफा घेऊन नुकताच निघाला होता. "मित्रांनो," तो आपल्या माणसांना म्हणाला, "रस्ता अगदी उत्तम स्थितीत आहे. आपल्या आधी जे गेले त्यांना धन्यवाद, जंगलही मोकळं झालेलं आहे, हिंस्र श्वापदं निघून गेली आहेत. पण थांबा, मला कुणीतरी येताना दिसतं आहे."





ते कुणीतरी म्हणजे पुन्हा यक्षच होता. आपल्या नोकरांना बरोबर घेऊन आला होता. या प्रवाशांजवळचे मोठमोठे पाण्याचे रांजण पाहून तो मागच्यांच-प्रमाणे खोः खोः हसला. "फेकून दया ते." तो म्हणाला, "मी जेथून आलो तेथे अन्नपाणी भरपूर आहे."

पण शहाणा व्यापारी आपल्या माणसांना म्हणाला, "हे बघा, हा काय सांगतो आहे त्यावर माझा मुळीच विश्वास बसत नाही. कारण पुढचा प्रदेश कोरडा दिसतो आहे. या माणसांनी ओले कपडे आणि कमळांच्या माळा घातल्या आहेत पण आसपास पावसाचे चिन्हदेखील दिसत नाही. आभाळ स्वच्छ आणि निरभ्र आहे. माझी खात्री आहे, ही माणसं नाहीत, हे यक्ष असावेत."

आणि यक्ष जे काही सांगत होता त्याच्याकडे मुळीच लक्ष न देता त्याने आपल्या गाड्या तशाच पुढे चालवल्या. लौकरच तेही वैराण वाळवंटात पोहोचले. पण शहाण्या माणसाने अन्नपाणी फेकून दिले नव्हते. त्यामुळे त्याच्या माणसांचा प्रवास सुखाचा झाला. शहरात पोहोचल्यानंतर बाजारात जाऊन भाव ठरवायला त्यांना पुष्कळ सवड सापडली. शहाण्या माणसाने आपला माल खूप नफा घेऊन विकला. आणि घरी परतला तो खुशीत येऊन, समाधानी होऊन.

योग्य दिशेने विचार करणारी माणसे अशी क्वचित आढळतात नाही?



## प्रसाद

एका गावात एक शेतकरी राहात होता. त्याला दोन मुले होती. मुलगा गोपाळ आणि मुलगी होती उमा. मुलांची आई लहानपणीच वारली होती. त्यावेळी उमा सारी ८ वर्षांची होती. पण उमाने आपल्या धाकटया भावाला—गोपाळला, मुलाप्रमाणे वाढवले होते. खाऊ पिऊ घातले होते. त्यांच्या वडिलांना तिचे फार कौतुक वाटायचे.

आणि एक दिवस मुलांचे वडीलही वारले. येवढ्या अफाट जगात दोघे पोरकी झाली. बाबा वारल्यावर गोपाळला सारखे रडू कोसळत होते. तो उमाला म्हणत होता.

"ताई, आई गेल्यावर तूच मला आईसारखं वाढवलंस. आता बाबाही गेले. आता आपल्याला कोण ?"

उमा त्याची समजूत घालीत म्हणाली, "गोपाळ, अरे मी आहे ना ? असं काय करतोस ? मी चांगली खंबीर आहे. मी आई झालेच होते तुझी. आता बाबाही होईन. तुला खूप शिकवीन, मोठा करीन. आपल्या बाबांचं शेत आहे. मी दुसऱ्या माणसांची मदत घेईन. सगळं करीन. असं वेड्यासारखं रडायचं नाही."

आणि मग उमाने आपल्या शेतात काम करायला गावातल्या खंडकऱ्यांना



बोलाविले. तीपण त्यांच्याबरोबर शेतात राबायची; गावातल्या लोकांना ती फार आवडत असे, कारण ती सर्वांशी फारच चांगली वागायची. त्यामुळे सगळ्या गावकऱ्यांनी तिला खूप मदत केली. तिने गोपाळला सांभाळले. शिकवले.

एक दिवस गोपाळ तिला म्हणाला, "ताई, आता तू मोठी झालीस. पण मी अजून तसा लहानच आहे. माझ्याजवळ हुंडापांडा दयायला पैसाही नाही. त्यामुळे तुझ्या लग्नाची फार काळजी वाटते. कसं होणार तुझं लग्न ?"

उमा म्हणाली, "हात् वेड्या लग्नाचं काय ? होऊन जाईल पटकन्."
आणि खरेच ! तिचे लग्न पटकन् झाले एक दिवस. त्यांच्याच गावात राहणाऱ्या एका तरुणाला उमा फार आवडायची. त्याने गोपाळजवळ तिच्यासाठी मागणी घातली. गोपाळला फार आनंद झाला.

उमा लग्नानंतर आपल्या घरी जायला निघाली तेव्हा गोपाळला म्हणाली, "हे बघ गोपाळ, तू मोठा झालाच आहेस. आता तूही लग्न कर. संसार कर. पण एक लक्षात ठेव. दर श्रावणातल्या एकातरी शुक्रवारी आपल्या कुलदेवतेची पूजा करायला विसरू नकोस. कारण ती पूजा आपल्या घराण्यात परंपरागत चालू आहे." गोपाळला येवढे बजावून ती आपल्या नवऱ्याबरोबर तिच्या घरी गेली.

गोपाळने शेतात खूप कष्ट केले. तो चांगलाच श्रीमंत झाला. त्याने एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या कमळा नावाच्या सुंदर मुलीशी लग्न केले. लग्नानंतर श्रावणाच्या महिन्यात त्याला उमाने सांगितलेल्या पूजेची आठवण झाली. त्याने एका शुक्रवारी खूप मोठी पूजा बांधायचे ठरविले. अर्थातच आपल्या ताईला बोलाविण्याची त्याची फार इच्छा होती. पण त्याची बायको कमळा म्हणाली, "तुमची बहीण अगदी गरीब आहे. ती येईल फाटक्या चिंध्या घालून आणि

आपली सगळया पाव्हण्यांच्यात चांगलीच शोभा होईल. काही नको तिला बोलवायला."

गोपाळने काही उमाला निमंत्रण दिले नाही. पूजा मोठ्या थाटामाटाने सुरू झाली आणि....

आणि आमंत्रण नसतानाही उमा पूजेला आली. पाहुण्यांची सरबराई चालली होती. सगळ्यांना चांदीच्या वाट्यांतून प्रसाद दिला जात होता. कमळाने उमाकडे लक्षच दिले नाही. उमा आली, तिने एका पत्रावळीवरचा प्रसाद उचलला आणि म्हणाली, "गोपाळ, बरा आहेस ना? कमळावहिनी, बरी आहेस ना? अरे बोलाविलं नाहीस तरी मी तुझी सख्खी बहीण. गडबडीत विसरला असशील बोलवायला म्हणून आले हक्काने; पूजेचा प्रसाद घेतल्याशिवाय मला चैन कसं पडेल? तुम्ही सुखी राहा दोघं."

आणि त्या दोघांना असा आशीर्वाद देऊन उमा निघून गेली. लोक आश्चर्याने बघतच राहयले. कुजबुजायला लागले.

दुसऱ्या वर्षी पण पूजेचा थाटमाट उडाला होता. यावेळीही गोपाळने उमाला बोलाविले नाही. पण उमा आपल्या मुलाला कडेवर घेऊन आली. म्हणाली, "गोपाळ, कमळावहिनी, यंदा पण विसरलात का? पण हा पोरगा मामाकडे जायचा हट्टच धरून बसला. अरे मी तुझी सख्खी बहीण. हा तुझा सख्खा भाचा. आम्हांला कशाला बोलावणं हवं? प्रसादावर हक्कच आहे आमचा. सुखी राहा हो."

उमा बोलत होती. सगळे लोक आश्चर्याने ऐकत होते. कमळाला राग येत होता. गोपळला लाज वाटत होती.

असेच सात वर्षे चालले. दर वर्षी पूजेच्या वेळी उमा आपल्या गरीब पोशाखात, बोलाविल्याशिवायच मुलांना घेऊन यायची. पानावरचा प्रसाद खायला घालायची आणि गोपाळ कमळाला आशीर्वाद देऊन निघून जायची.



मध्यंतरीच्या काळात उमाच्या नवऱ्यानेही व्यापारात खूप पैसा मिळविला. तो श्रीमंत झाला. घरात उंची कपडे, दागदागिने आले. दारात घोडागाडी आली. गोपाळला समजले की आपली ताई पैसेवाली झाली आहे. कमळाला समजले की आपली नणंद श्रीमंत झाली आहे.

त्या वर्षी पूजेच्या निमंत्रणाच्या वेळी कमळा गोपाळला म्हणाली. "हे बघा, उमावन्संनापण पूजेला बोलवा. त्यांना न बोलावणं नाहीतरी चूकच. किती झालं तरी ती तुमची सख्खी बहीण आहे. मुलांना घेऊन या म्हणावं. स्वतः जाऊन बोलवा."

गोपाळ हो म्हणाला आणि उमाच्या घरी जाऊन तिला निमंत्रण देऊन आला. दरवर्षीप्रमाणे पूजेची तयारी झाली, सगळी माणसे जमली. पण यंदा त्यांची सरबराई करण्याकडे गोपाळचे लक्ष नव्हते. कमळाचेही नव्हते. ती दोघे उमाची वाट पाहात होती.

इतक्यात दारात गाडी वाजली. गोपाळ पुढे धावला. त्याने हाताला धरून उमाला गाडीतून उतरवले. सगळी लोकं बघत होती. उमा आज बुट्टयांचा शालू नेसली होती. दागिन्यांनी खूप सजली होती. अंगावर भरजरी शाल पांघरलेली होती. पण आज ती एकटीच होती. मुले नव्हती तिच्याबरोबर.

ती आत आल्याबरोबर गोपाळने तिला बसण्यासाठी नक्षीदार चौरंग दिला. तिच्यापुढे एक चांदीची थाळी ठेवली. त्यात सगळी पंचपक्वान्नं वाढली. त्या थाटमाटाकडे पाहून उमा हळूच हसली. गोपाळ जवळ उभा होता. कमळापण उभी होती. उमा म्हणाली, "गोपाळ, आणखी एक चौरंग हवा आहे मला."


तिने म्हणायचा अवकाश की आणखी एक चौरंग हजर झाला. उमाने आपल्या अंगावरची शाल काढून त्या दुसऱ्या चौरंगावर ठेवली. गोपाळला वाटले तिला उकडत असेल. त्याने कमळाला सांगितले,

"जा पंखा घेऊन ये. ताईला उकडतंय, दिसत नाही?"

कमळा पंखा घेऊन आली आणि उमाला वारा घालू लागली. उमाने आता आपला एकेक दागिना उतरून दुसऱ्या चौरंगावर ठेवायला सुरुवात केली.



गोपाळ म्हणाला, "ओझं झालं असेल ताई तुला दागिन्यांचं. इतके भारी दागिने आहेत." आणि कमळाला म्हणाला — "पंखा जरा जोराने हालव. ताईला उकडतंय, दागिन्यांचं ओझं झालंय." कमळा जोराने वारा घालू लागली. मग उमाने सगळे दागिने उतरवून झाल्यावर एकेका दागिन्यावर चांदीच्या ताटातला एकेक घास उचलून ठेवायला सुरुवात केली. सगळी आश्चर्याने बघत होती. गोपाळने आश्चर्याने विचारले, "ताई हे काय करतेस?" तेव्हा उमा हसून



म्हणाली, "गोपाळ, अरे ज्याचं जेवण त्याला देते आहे. आजचं हे जेवण माझ्यासाठी थोडंच आहे? आजचं जेवण आहे या भरजरी कपड्यांचं आणि किंमती दागिन्यांचं. माझं म्हणशील तर मी नेहमीप्रमाणे पानावरचा प्रसाद घेईन. इतकी वर्षं मी आणि माझ्या मुलांनी तोच नाही का खाल्ला?"

सगळे लोक कुजबुजू लागले. गोपाळला कमळाला आपली चूक कळून आली. दोघे तिच्या पाया पडून क्षमा मागू लागली. उमाने त्या दोघांना पोटाशी धरले आणि म्हणाली, 'गोपाळ, लक्षात ठेव. पैशापेक्षाही जगात आणखी एक मौल्यवान गोष्ट आहे. ती म्हणजे प्रेम."

गोपाळला रडू आवरेना. तो म्हणाला, "खरंच ताई, तू माझे डोळे उघडलेस."

## मऊ बिछान्याची गोष्ट

एक खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट. एका राजाच्या राणीची झोपेबद्दल तक्रार होती. तिला रात्री शांत झोप येत नसे. कितीही मऊ कापसाची गादी असली तरी ती म्हणायची, "छे, काहीतरी टोचतंय माझ्या अंगाला."

राज्यातला अगदी उत्तमात उत्तम कापूस आणवून त्याची गादी केली पण राणीचे काही समाधान होईना.

शेवटी एक दिवस ती राजाला म्हणाली, "हे पाहा, मला कसलीतरी आणखी मऊ गादी तयार करून दया. नाहीतर झोप न येण्यामुळे मी आजारी पडेन."

राजाने खूप विचार केला. पण त्याला काही सुचेना. इतका सायीसारखा मऊ कापूस आणून त्याची गादी केली तरी हिला टोचते. मग आता गादी तरी कसली करायची?

राजा विचारात पडला होता तेवढ्यात राजाचा प्रधान तेथे आला आणि म्हणाला, "महाराज, राणीसरकारांसाठी एक गादी मी सुचविली तर चालेल का? मी सुचवीन त्या गादीवर त्यांना नक्की शांत झोप लागेल."

राजा उत्सुकतेने म्हणाला, "असं? मग सांगा बरं कसली गादी ते?" प्रधान म्हणाला, "महाराज, आपल्या बागेत जाई, जुई, चमेलीचे कितीतरी





वेल आहेत. त्या फुलांच्या सगळ्या कळ्या संध्याकाळी खुडायच्या. त्या राणी-सरकारांच्या बिछान्यावर पसरायच्या. रात्रीपर्यंत त्या कळ्या फुलतील. त्यांची मऊ मुलायम पुष्पशय्या तयार होईल. मग राणीसरकारांना गादी मुळीच खुपायची नाही. आणि त्यांना शांत झोप लागेल."

प्रधानाची सूचना राजाला एकदम पसंत पडली. तो म्हणाला. "वा:! तुम्ही तर फारच सुंदर उपाय सुचविलात. माझ्या मागची रोजची कटकट यामुळे नक्की चुकेल."

प्रधानाने माळ्याला अशा पुष्पशय्येचा हुकूम सोडला.

माळी दुसऱ्या दिवसापासून रोज जाईजुईच्या कळ्या संध्याकाळी बागेतून तोडून आणायचा. राणीसाहेबांच्या गादीवर त्यांचा थर पसरून ठेवायचा. रात्र झाली की त्या सगळ्या कळ्या उमलायच्या. त्यांचा मऊ मऊ बिछाना तयार व्हायचा. फुलांचा सुगंध सगळ्याभर दरवळायचा. राणीसाहेब त्या मऊ मऊ फुलांच्या गादीवर फुलांच्या सुवासाने धुंद होऊन झोपायच्या. राणी खुशालली. राजा माळ्यावर खूप झाला कारण त्याच्यामागची राणीसाहेबांची रोजची कटकट मिटली होती. राजाने माळ्याला खूप मोठं बक्षीस दिलं त्याबद्दल.

पण एक दिवस सकाळी....बापरे....राणीसाहेब तणतणत राजाकडे गेल्या. आणि म्हणाल्या "कुठे आहे तो माळी? त्याला आताच्या आता बोलावून आणा." राजा आश्चर्याने म्हणाला, "हो हो, पण झालं काय असं रागवायला?"



"झालं काय?" राणीसाहेब जास्तच नाक फेंदारून म्हणाल्या,

"काल माझ्या गादीत त्याने काहीतरी टोचणारं ठेवलं होतं. असं बोचलं पाठीला रात्रभर. मला मुळीच चैन नाही, झोप नाही. त्या माळ्याला आधी शिक्षा करा."

राजाने माळ्याला बोलावणे पाठवले. माळी आल्यावर त्याला विचारले, "काय रे, काल राणीसाहेबांचा बिछाना कोणी तयार केला?"


माळ्याला राजाच्या प्रश्नाचा रोख कळेना. तो म्हणाला, "मीच केला महाराज, रोजच्याप्रमाणे."



"पण मग काल राणीसाहेबांच्या पाठीला टोचेल असं काय ठेवलं होतंस तू त्या बिछान्यामध्ये? चांगली शिक्षा दयायला हवी तुला."

राजाने रागावून म्हटले. माळी गयावया करून सांगू लागला, "महाराज, मी कसं असं भयंकर कृत्य करीन? राणीसाहेबांच्या बिछान्यात त्यांच्या पाठीला टोचेल अशी वस्तू ठेवण्याचा गाफीलपणा माझ्या हातून होईलच कसा? मी फक्त रोजच्याप्रमाणे जाई-जुईच्या कळ्या पसरल्या होत्या बिछान्यावर. दुसऱ्या कुणी काही ठेवलं असलं तर...."

माळ्याचं बोलणं अर्धवट तोडून राणीसाहेब म्हणाल्या, "दुसरं कुणी कशाला काही ठेवील? आणि तू बिछाना तयार केल्यावर कुलूप घालतोस ना माझ्या शय्यागृहाला? मग कुणीतरी फिरकतं का तिकडे? हा तुझाच काहीतरी हलगर्जीपणा दिसतोय."





राणी चिडून आणखी काही बोलणार होती तेवढ्यात राजा म्हणाला, "हा वाद हवा कशाला? चला आपण त्या बिछान्यात काय आहे ते पाहून येऊ."

मग राजा, राणी, माळी, प्रधान सर्वांनी जाऊन तो फुलांचा बिछाना बघितला. त्यावर जाईजुईच्या सुकलेल्या फुलांखेरीज दुसरे काहीही नव्हते.

राजा म्हणाला, "छेः काहीसुद्धा नाही याच्यावर."

तेवढ्यात राणीसाहेब ओरडून म्हणाल्या, "नाही कसं? हे पाहा."

आणि त्यांनी आपल्या बिछान्यावर पसरलेल्या त्या सुकलेल्या फुलांमधून एक न उमललेली कळी उचलून राजेसाहेबांच्यापुढे धरली. त्या म्हणाल्या, "पाहलात या माळ्याचा हलगर्जीपणा, ही मुकी कळी उमलणार नाही, मग



ती मला टोचेल हे याच्या नको होते का लक्षात यायला? कामचुकारपणा नुसता."

राणीसाहेब रागाने थरथर कापत होत्या. राजाला त्यांची कशी समजूत घालावी ते कळेना. माळीही घाबरला होता. तेवढ्यात राणीसाहेब रडत रडत म्हणाल्या, "मी आता इथे राहातच नाही. माझी जिथे कुणी काळजी घेत नाही तिथे मला राहायचं नाही. मी माझ्या भावाकडे जाते. मला पोहोचवून दयायची व्यवस्था करा."



राजाने त्यांची खूप समजूत घातली पण त्या ऐकेनात. राणीचा भाऊ राहात होता दुसऱ्या गावी. पार समुद्रापलीकडे. तिकडे जाणे काही सोपे नव्हते पण राणी ऐकेचना. शेवटी राजाने एक खास जहाज दिले. दहाबारा नोकर बरोबर दिले. खलाश्यांना जहाज नीट जपून न्यायला सांगितले आणि राणीसाहेबांची सफर सुरू झाली.

पहिला दिवस चांगला गेला. समुद्राच्या मोकळ्या वाऱ्याने राणीसाहेबांचा रागही ओसरला. पण दुसऱ्या दिवशी समुद्रालाच राग आला. खूप मोठ्ठे वादळ झाले. कप्तानाने जहाज वाचवायचा खूप प्रयत्न केला पण वादळात ते शेवटी फुटलेच. कप्तान, राणीसाहेब, नोकरचाकर सगळीजणं समुद्रात फेकली गेली. बेशुद्ध झाली.

दुसऱ्या दिवशी राणीसाहेब शुद्धीवर आल्या. त्या जहाजाच्या एका फुटलेल्या कोपऱ्यात अडकल्या होत्या. तो लाकडी कोपरा पाण्यावर तरंगत होता. नोकराचाकरांचा, इतर कुणाचाही पत्ता नव्हता. राणीसाहेब खूप घाबरल्या होत्या पण तशाच तरंगत तरंगत खूप दूर गेल्या. एका किनाऱ्याला लागल्या. किनाऱ्यावरून उतरून चालत चालत एक गाव लागले तेथे गेल्या. गावाच्या कडेलाच एक झोपडी होती. झोपडीत एक म्हातारा म्हातारी राहात होती. या दमल्या थकल्या बाईला त्यांनी आपल्या घरी ठेवून घेतले. त्या गावात मोठे धरणाचे काम चालले होते. म्हातारा म्हातारीने राणीला म्हटले, "बाई, आम्ही थकलो आहो. तू त्या धरणावर मजुरी कर. आपण तिघं त्या मजुरीच्या पैशात राहू."

राणी दुसऱ्या दिवसापासून धरणावर काम करू लागली. रात्री जमिनीवर चटई अंथरून झोपू लागली. आता तिला जमीन टोचत नव्हती. चटई बोचत नव्हती. चटईवर आडवी झाली की झोप लागे.



पण असे किती दिवस चालणार? तिला घरची आठवण यायला लागली. पण घरी जाणार कशी?

आणि एक दिवस काय गंमत झाली. धरणाचे काम बघायला त्या देशाचा राजा आला. त्या दिवशी त्याने स्वतः सगळ्या मजुरांना मजुरी वाटली. राणी मजुरी घ्यायला पुढे आली. राजाने तिच्याकडे पाहिले. कपडे जुनेपाने, वेष सगळाच बदललेला पण तरीही राजाने तिला ओळखून म्हटले— "ताई."

हो. तो तिचा भाऊच होता. ती ज्याच्याकडे जाणार होती तोच. पण राणीनेही ओळखले नाही हे त्याचेच राज्य म्हणून. भावाकडे आली तरी हे गाव कशाला पाहिले होते तिने यापूर्वी? ती यायची राजधानीत. बंद मेण्यातून.

भावाने तिची चौकशी केली. तिने सगळे सांगितले. मग भावाने राजाला बोलावणे पाठवले. भाऊ बहिणीला घरी घेऊन आला. राजाही आला.

रात्री झोपायच्या वेळी राजा म्हणाला, "हिला जाईजुईच्या फुलांचा बिछाना हवा हं आणि त्यात सगळ्या फुलणाऱ्या कळ्या हव्यात."

पण राणी म्हणाली, "छेः मला हवी झोपायला एक चटई फक्त. मला काही त्या कळ्या खुपत नव्हत्या. मला खुपत होता माझा आळशीपणा. इथे

मी धरणावर दिवसभर काम करायची. मीठभाकरी खायची. रात्री शांत झोपायची. अशा कष्टानंतर आणि स्वतःच्या श्रमाचं खाल्ल्यानंतर चटईवरसुद्धा झोप येते. माझी चूक मला समजली." राजा हसला. आणि राणीला घेऊन आपल्या राज्यात परत आला.



## उंदराने दिले धन

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट; वाराणशी या प्रसिद्ध शहरात चुल्लक नावाचा एक विद्वान पंडित राहात होता. एक दिवस तो असाच विचारात मग्न होऊन रस्त्याने जात होता. जाता जाता त्याला एक मेलेला उंदीर रस्त्यात पडलेला आढळला.

"शी: कसला गलिच्छ प्राणी," तो जरा मोठ्यानेच पुटपुटला. "हो पण खरंच. हा मेलेला उंदीरसुद्धा एखादयाच्या उपयोगी पडू शकेल. माझी खात्री आहे. एखादया शहाण्या माणसाने जर याचा योग्य तो उपयोग केला तर या उंदरापासूनही त्याला खूप पैसे मिळू शकतील."

चुल्लकाचे हे बोलणे जवळून त्याच रस्त्याने जाणाऱ्या हरी नावाच्या एका तरुणाने ऐकले. त्याच्या मनात विचार आला, "हा माणूस मोठा विद्वान पंडित आहे. तो जे म्हणाला त्यात काहीतरी तथ्य असलंच पाहिजे." आणि त्याने तो मेलेला उंदीर उचलला.

"आता या उंदराचं काय करावं ?" असा विचार करीत चालला असता हरीच्या मनात एक कल्पना चमकली. "खरंच की, उंदराइतकं प्रिय मांजराला दुसरं काय असणार? माझ्या शेजाऱ्याकडे मांजर आहे पण उंदीर नाहीत. बिचाऱ्या त्या उपाशी मांजराला हा उंदीर म्हणजे मोठी मेजवानीच होईल."



ही कल्पना सुचताच तो आपल्या शेजाऱ्याकडे गेला आणि त्याने त्याला तो उंदीर दाखवला.

"अरे, हा कुठे तुला मिळाला?" शेजारी मोठ्या आनंदाने ओरडला. "हे बघ हे मी देतो ते नाणं घे आणि माझ्या मांजरासाठी हा उंदीर दे."

हरीने ते नाणे घेतले, एका दुकानात गेला आणि त्याने थोडी मिठाई विकत घेतली. मग मिठाईचा पुडा आणि पाण्याचा एक हंडा घेऊन तो गावाच्या वेशीजवळ गेला. वेशी-जवळच एक सुंदर बाग होती. बागेच्या दाराशी एक मोठ्ठे वडाचे झाड होते. हरीने तो मिठाईचा पुडा आणि पाण्याचा हंडा जमिनीवर ठेवला आणि झाडाच्या सावलीत तो येणारा जाणारांची वाट पाहात बसला.

थोडयाच वेळात दारातून एका माळ्याने प्रवेश केला. सबंध दिवसभर काम करून तो थकून गेला होता. त्याला भूक लागली होती. हरीने त्याला खायला मिठाई आणि भांडंभर पाणी प्यायला दिले. तो म्हातारा माळी तृप्त झाला, बेहद्द खूष झाला आणि या उपकाराची फेड म्हणून त्याने हरीला एक मोठ्ठा, सुंदर फुलांचा गुच्छ दिला.



हरीने ती फुले विकली आणि त्या पैशात आणखी मिठाई विकत घेतली. पुन्हा तो त्या बागेच्या दाराशी येऊन बसला. या खेपेला त्याने त्या बागेत काम करणाऱ्या सगळ्या माळ्यांना मिठाई दिली. पाणी दिले आणि त्याच्या बदल्यात त्याला फुलांचे खूप गुच्छ मिळाले. ती सगळी फुंले विकून त्याने मिठाईचे मोठ्ठे पुडे खरेदी केले आणि आता फक्त माळ्यांनाच नव्हे तर बागेत येणाऱ्या इतर नागरिकांनाही त्याने मिठाई आणि पाणी दिले. यावेळी मात्र सर्वांनीच त्याला त्याबद्दल पैसे दिले. आता हा हरीचा रोजचाच उदयोग झाला आणि त्यातून त्याने पुष्कळ पैसे मिळविले.

एक दिवस शहरात खूप मोठे सोसाटयाचे वादळ झाले. वादळाने झाडे गदागदा हालली. त्यांच्या फांदया मोडल्या, फुले गळून पडली. पानांचा सडा पडला. थोडयाच वेळात बाग या पालापाचोळयाने इतकी भरून गेली की हा कचरा दूर करून बागेतली जमीन स्वच्छ करणे माळ्यांना आपल्या शक्ति-बाहेरचे वाटू लागले. ते पाहून हरी पुढे आला आणि म्हणाला, "मी हे काम हाती घेतो. पण मला तुम्ही त्याबद्दल भरपूर बिदागी मात्र दिली पाहिजे."

माळ्यांनी ते कबूल केले; कारण तो दिवस म्हणजे राजाच्या पाहणीचा होता, बाग तपासणीचा होता. त्यामुळे माळी म्हणाले, "अशा या अवस्थेत जर राजेसाहे-बांना ही बाग दिसली तर आम्हांला ते ताबडतोब नोकरीवरून काढून टाकतील."

हरीची लहान मुलांशी दोस्ती होती. त्याला आसपास जेवढी मुले जमविता आली तेवढी त्याने जमविली. त्या मुलामुलींना तो म्हणाला, "हे पाहा, आज राजेसाहेब बागेची पाहणी करायला येणार आहेत, तेव्हा तुम्ही अगदी झटकन् अर्ध्या तासात ही बाग स्वच्छ आणि नीटनेटकी करा पाहू. राजेसाहेब खूष झाले पाहिजेत."

ताबडतोब शंभर मुले-मुली अगदी उत्साहाने त्या कामाला लागली. त्यांना तर त्या कामाची मजाच वाटत होती. त्यांनी अर्ध्या तासात तो सगळा कचरा पालापाचोळा भरून काढून बाग स्वच्छ केली आणि या कचऱ्याचा बागेबाहेर ढीग करून ठेवायचा त्यांचा बेत होता. पण हरी म्हणाला, "आपण हा कचरा





इथून थोडा आणखी लांब नेऊ या."

बागेपासून एका हाकेच्या अंतरावर एका कुंभाराची भट्टी होती. हरीने आणि त्याच्याबरोबर त्या मुलांनी तो पालापाचोळा त्या भट्टीजवळ नेऊन तेथे त्याचा मोठ्ठा डोंगर रचून ठेवला.

हरी त्या कुंभाराला म्हणाला, "मित्रा कुंभारा, अरे हे बघ, तुला महिनाभर पुरेल इतकं हे जळण आणलं आहे" ते हाताशी मिळालेले जळण बघून कुंभार खूप झाला. हरीला त्या जळणाबद्दल भरपूर पैसे दिले.

इकडे बाग तर अशी स्वच्छ आणि सुंदर दिसायला लागली होती की माळ्यांनी पण खूष होऊन हरीला या सफाईच्या कामाचे पैसे दिले. अशी दुप्पट बिदागी मिळाल्याने हरीला फार आनंद झाला. त्याने त्या बिदागीचा अर्धा हिस्सा स्वतःसाठी ठेवला आणि अर्ध्या मिळकतीतून मिठाई, खाऊ आणला आणि त्याच्या दोस्तमुलांना वाटून टाकला. पोरांनी त्याला "काका-काका" म्हणून आनंदाने मिठ्या मारल्या आणि ती नाचत, गात निघून गेली.

यानंतर हरीने रस्त्याच्या कडेला एक छोटे झोपडे उभारले आणि मातीचे सुंदर रांजण विकत घेतले. हे सगळे रांजण पाण्याने भरून त्याने त्या ठिकाणी पाटी लावली. "पिण्याचे पाणी."

इकडे काय झाले, त्याच रस्त्याने डोक्यावर गवताचे भारे घेऊन पाचशे मोळीविके चालले होते. भर दुपारच्या तापलेल्या उन्हाने ते थकून घामाघूम झाले होते. ते या झोपड्याजवळ थांबले आणि पोटभर पाणी प्याले.

तहानलेले ते मोळीविके पाणी पिऊन तृप्त झाले आणि म्हणाले, "तुमच्या या सेवेने आम्ही संतुष्ट झालो आहोत. फार उपकार झाले तुमचे. हे तुमचे उपकार कसे फेडणार? कारण आमच्याजवळ तर पैसे नाहीत आणि आमच्या डोक्यावर जरी हे भाराभर गवत असलं तरी जवळपास कुणी गिऱ्हाईकही दिसत नाही."

"मला पैसे नकोतच" हरी म्हणाला, "तुमच्यापैकी प्रत्येकाने आपापल्या

गवताच्या भाऱ्यापैकी एकेक पेंढी मला दिलीत तरी पुरे आहे. शिवाय तुम्हांलासुद्धा मी एक आनंदाची बातमी देणार आहे. एक सौदागर लौकरच या आपल्या शहराला भेट देणार आहे. तो तुमचं सगळं गवत विकत घेईल. फक्त मला एकच वचन दया. मी माझ्या या पेंढया त्यांना विकण्यापूर्वी तुम्ही तुमचं गवत विकायचं नाही."

मोळीविके तसे वचन देऊन बाजाराच्या वाटेला लागले. तेवढ्यात तो सौदागर पाचशे घोडे घेऊन आला. तो अगदी रखरखीत प्रदेशातून आला होता आणि त्याच्या घोडयांना गवताची एक काडीदेखील खायला मिळाली नव्हती. त्याने तत्काळ हरीजवळच्या पाचशे पेंढया विकत घेऊन त्याला पाचशे चांदीची नाणी दिली.

हरीचे तहानेल्यांना पाणी देण्याचे काम चालूच राहयले. त्यानंतर एक बातमी आली की एक माणूस नदीपलीकडून येत आहे. त्याच्याजवळ मालाने खच्चून भरलेला होडयांचा ताफा आहे. "मला ताबडतोब गेलं पाहिजे." असे म्हणून हरीने बाजारात जाऊन आपल्याला मिळालेली ती पाचशे चांदीची नाणी खर्चून एक गाडी विकत घेतली. ती फुलांनी सजविली, आणि एक खुशीचे, आनंदाचे गाणे गात तो गाडी घेऊन नदीवर गेला.

पहिली होडी किनाऱ्याला लागल्याबरोबर हरीने कप्तानाला गाठले आणि त्याला एक सोन्याची आंगठी देऊन म्हणाला, "कप्तानसाहेब, तुम्हांला मालाचं जे भाडं मिळालं असतं त्याची ही किंमत. तुमच्या सगळ्या होडयांमधला सगळा माल मला दया आणि मी तुम्हांला आणखीसुद्धा पैसे देईन."

कप्तानाने आपल्या होडयांमधला माल उतरवला, आपला सर्वच्या सर्व माल जागच्याजागी खरेदी करणारे गिऱ्हाईक भेटल्यामुळे व्यापारी खूष झाला होता. बाजारात जा, माल खपविण्यासाठी किंमतीबद्दल हुज्जत घाला ही त्याची सगळी कटकट वाचली होती.

त्याने हरीशी व्यवहार ठरविला. तेवढ्यात इतर दलाल तेथे हजर झाले. हरीने आपल्यावर कुरघोडी करून सगळ्याच्या सगळा माल विकत घेतलेला पाहून ते




निराश झाले. मग त्यांनी आपले सर्वांचे पैसे एकत्र केले आणि हरीला मालाची दुप्पट किंमत देऊन सगळा माल त्याच्याकडून खरेदी केला. या रकमेतून अर्धी रक्कम व्यापाऱ्याला देऊन हरीने त्याचे पैसे चुकते केले. ज्या कप्तानाने हा सौदा घडवून आणला त्या कप्तानाला त्याने एक हजार नाणी दिली आणि तरीही खिशात भरपूर नाणी घेऊन तो आपल्या वाटेला लागला.

त्याने प्रथम जर काय केले असेल तर ते म्हणजे चुल्लकाला भेटणे. हरी त्याच्याकडे गेला, त्या पंडिताला त्याने आदराने नमस्कार केला आणि दोन हजार चांदीच्या नाण्यांची एक थैली त्याच्यापुढे ठेवली.



"हे काय?" चुल्लकाने विचारले. "आपण चार महिन्यांपूर्वी दिलेल्या सल्ल्याची ही दक्षिणा." असे म्हणून हरीने आपली सारी हकीकत, ते सगळे अनुभव चुल्लकाला सांगितले. चुल्लकाला फार आनंद झाला. तो म्हणाला, "तू खरंच फार हुशार आहेस. मी सहज नकळत उच्चारलेले ते शब्द कुणी ऐकले असतील असं माझ्या स्वप्नातही आलं नाही. पण तू ते ऐकलेस आणि त्यातल्या सत्याचा, तथ्याचा खराखुरा उपयोग केलास. तुझ्यासारखी माणसं आयुष्यात नेहमीच यशस्वी होतील."



## न्यायाची खुर्ची

उज्जैन हे एक फार जुने आणि इतिहासप्रसिद्ध शहर. या शहराच्या वेशी-बाहेरचा भाग छोट्या छोट्या टेकड्यांनी वेढलेला होता. एक दिवस काही मुले अशीच मैदानात खेळत असताना एक मुलगा एका टेकडीवर चढला. चढता चढता त्याचा पाय एका दगडाला लागून ठेचाळला आणि तो मुलगा खाली पडला. पण तो चटकन उठला आणि आपण कशाला अडखळून पडलो ते त्याने पाहिले, तो ज्याला अडखळला होता तो होता एक गुळगुळीत चपटा दगड.

"अरे, हे बघा मला काय सापडलं?" तो आपल्या मित्रांना मोठ्याने ओरडून सांगू लागला, "दगडाची एक सुंदर बैठक. ए, मला एक छान कल्पना सुचली आहे. आपण न्याय न्याय खेळूया. मी न्यायाधीश बनणार, या बैठकीवर बसणार आणि तुमच्या फिर्यादी ऐकणार."

दुसऱ्या सगळ्या मुलांनासुद्धा ही कल्पना आवडली. मग त्यांच्यापैकी काही-जण चोर बनले, काही शिपाई झाले. शिपायांनी चोरांना ताबडतोब पकडले आणि टेकडीवरच्या त्या न्यायालयात खेचून आणले. शिपायांनी चोरी कशी पकडली यासंबंधी आपली फिर्याद पुढे मांडली. या चोरांना चोरी करताना पाहिलेले काही साक्षीदारही त्यांनी आणले. या छोट्या न्यायाधीशाने फिर्याद ऐकली. सगळ्या साक्षी ऐकल्या आणि तो चोरांना म्हणाला, "हे बघा, तुम्हाला यावर काही सांगायचं आहे का?"

मग चोरांनी आपली बाजू मांडली. न्यायाधीशाने दोन्ही बाजू ऐकून घेतल्या.





त्या चोरांच्या विरुद्ध असलेला पुरावा पाहयला, त्यांना दोषी ठरवले आणि तुरुंगवासाची शिक्षा दिली.

लौकरच गावात सगळीकडे "मुलाच्या शहाणपणाची कीर्ती पसरली. कुणी म्हणाले त्याच्यात दैवी शक्ती असली पाहिजे." दुसरे म्हणाले, "आता आपल्यात कुणाचं भांडण झालं की आपण ते सोडवायला या मुलाकडे नेऊ या. आणि बघूया तो काय करतो ते."

लौकरच या चमत्काराची बातमी राजाच्या कानावर गेली. त्याला आश्चर्यही वाटले आणि रागही आला. तो म्हणाला, "न्याय देण्याचा अधिकार माझा. तो माझ्यापासून हिरावून घेणारे हे कोण पोरगे? मी स्वतः जातो आणि त्या पोरट्याला कैद करतो."

मग राजा आपल्या सरदारांबरोबर आणि शिपायांबरोबर टेकडीवर गेला. टेकडीवर मुले नेहमीप्रमाणे न्यायाधीशाचा खेळ खेळत होती.

राजाने थोडा वेळ हा खेळ बघितला, आणि त्यालाही फार नवल वाटले. तो थक्क झाला.

"मला कबूल केलंच पाहिजे" तो आपल्या सरदारांना म्हणाला, "मोठ्या न्यायाधीशांपेक्षा हा छोटा न्यायाधीश खरोखरीच जास्त शहाणा आहे. त्याच्यात काहीतरी जादू असावी."

"खरं आहे महाराज." सरदार म्हणाले, "पण नेहमी न्यायाधीश बनणारा मुलगा हा नव्हे. हा वेगळाच आहे."

आणि ते खरेच होते. नेहमी न्यायाधीश बनणारा मुलगा त्या दिवशी गैरहजर होता, म्हणून त्याचा एक मित्र न्यायाधीश बनला होता.

"याचा अर्थ," राजा म्हणाला, "तो मुलगा ज्याच्यावर बसून हे न्यायदानाचं काम करतो त्या या दगडातच काहीतरी जादू असली पाहिजे. त्याच्यात दैवीशक्ती असली पाहिजे. तेव्हा हा दगड ताबडतोब इथून हालवून राजवाड्यात घेऊन चला."

राजाच्या हुकमाप्रमाणे नोकरांनी ताबडतोब कुदळी घेतल्या, खोरी घेतली, आणि ती टेकडी खोदायला सुरुवात केली आणि जी वस्तू बाहेर आली ती पाहून सगळे थक्क झाले.

तो दगड साधासुधा नव्हता. ती एक गवंड्यांनी बनवलेली सुंदर खुर्ची होती. त्या खुर्चीची कोरीव पाठ जमिनीत लपलेली होती. लौकरच खोदता खोदता त्या खुर्चीचे चारी पायही बाहेर निघाले. प्रत्येक पायावर देवदूतासारखी सुंदर दिसणारी एकेक मूर्ती कोरलेली होती.

"अरे, ही तर खुर्ची आहे." एकजण म्हणाला

"खुर्ची नाही नुसती, हे सिंहासन आहे." दुसरा म्हणाला.

आणि या शहराचा इतिहास माहीत असलेला एक विद्वान पंडित म्हणाला, "शेकडो वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या महान राजा विक्रमाचं हे सिंहासन आहे. राजा विक्रम फार बुद्धिमान आणि श्रेष्ठ राजा होता. ही त्याचीच खुर्ची असली पाहिजे. आणि हिच्यावर बसूनच तो आपलं सुप्रसिद्ध न्यायदान करीत असावा."

"आपण ही स्वच्छ घासून पुसून आपल्या राजवाड्यातल्या न्यायमंदिरात ठेऊ या." राजा म्हणाला,

"यापुढे मला जेव्हा जेव्हा एखादे भांडण सोडवायचं असेल तेव्हा मी याच खुर्चीत बसून न्याय देईन."

"मग ती ती खुर्ची, धुतली गेली, तिला घासून पुसून स्वच्छ करून न्याय-मंदिरात ठेवली. एका शुभदिवशी राजाने प्रथमच तिचा उपयोग करायचे ठरविले. सर्व दिवसाच्या सगळ्या फिर्यादी तेथे मांडल्या होत्या. आणि राजा त्या....सिंहासनाच्या पायऱ्या चढणार तेवढ्यात कुणाचा तरी हुकमी आवाज ऐकू आला—"थांब."

राजा थांबला. त्याला फार आश्चर्य वाटले. त्या खुर्चीच्या पायावर कोरलेल्या देवदूतांपैकी एकजण मानवी आवाजात बोलत होता.

"राजा, प्रथम स्वतःला विचार," देवदूत म्हणाला,

"मी या सिंहासनावर बसायला योग्य आहे का?" देवदूत पुढे म्हणाला "आपण कधीही कुणाला लुबाडलं नाही अशी तुझी खात्री आहे?"

राजाचा चेहरा लज्जेने लाल झाला. "खरंच. आत्ता मला आठवलं, काही गावकऱ्यांच्या खाजगी जमिनींचा माझ्यासाठी मी उपयोग केला आहे."

"तर मग तू या सिंहासनावर बसायला लायक नाहीस" देवदूत म्हणाला.



"या सिंहासनावर बसण्यापूर्वी तू तीन दिवस तपश्चर्या केली पाहिजेस." असे म्हणून त्या देवदूताने आपले पंख पसरले आणि तो उडून गेला.

मग राजाने तीन दिवस उपास केला, देवाची प्रार्थना केली, आणि चौथ्या दिवशी तो सिंहासनाच्या पायऱ्या चढणार येवढ्यात दुसरा देवदूत म्हणाला,

"थांब, पण कधीही खोटं बोललो नाही याबद्दल तुझी खात्री आहे?"

पुन्हा राजाने तीन दिवस उपास केला, प्रार्थना केली, चौथ्या दिवशी तो सिंहासनाकडे वळला तेव्हा त्याला खात्री नव्हतीच. जेव्हा तिसऱ्या देवदूताने त्याला विचारले, "तू कधी शब्दाने किंवा कृतीने कुणालाही दुखावलं नाहीस का?" तेव्हा राजाला "नाही" म्हणत येईना. परत राजा मागे फिरला, आणि तिसरा देवदूत आपले पंख पसरून उडून गेला. आणखी तीन दिवस उपास आणि प्रार्थना केल्यानंतर राजा न्यायमंदिरात गेला. खुर्चीकडे जाताना त्याचे पाय लटपटत होते. चौथा देवदूत म्हणाला, "आता तुला या खुर्चीवर बसायला हरकत नाही. मात्र तुझ्याखेरीज दुसरा कोणीही माणूस या देशात या खुर्चीवर बसायला योग्य नाही अशी तुझी स्वतःची खात्री असली पाहिजे."

याबद्दल राजा कशी खात्री देणार? तो स्वतःशीच म्हणाला, "माझ्यापेक्षा विद्वान आणि न्यायदानाची जास्त पात्रता अंगी असणारे लोक या देशात असतीलही. पण मी आता खूप उपास केला, आणि आता यापुढे या मूर्ख बडबडीसाठी मी आणखी उपास करणार नाही. एखादं लहान मूल जर या खुर्चीत बसू शकतं तर माझ्यासारख्या राजाला तो अधिकार नक्कीच आहे."

आणि तो सरळ खुर्चीवर चढू लागला. पण चौथ्या देवदूताने त्याला थांबवले. तो म्हणाला, "राजा, या खुर्चीवर लहान मूल बसू शकतं. कारण देवाने उत्पन्न केलेला तो पवित्र प्राणी आहे. लहान मूल निष्पाप असतं. ते मोठं झाल्यानंतरच त्याच्या मनात वाईट गोष्टी येतात. आपण सर्वांनी हे लक्षात घेऊन वाईटापासून स्वतःला जपलं पाहिजे." आणि असे म्हणून चौथ्या देवदूताने आपले पंख पसरले आणि तो उंच उडाला. पण काय आश्चर्य. यावेळी त्याने श्रेष्ठ राजा विक्रमाची ती न्यायाची खुर्चीही आपल्या बरोबर उंच उंच आकाशात नेली.

## शहाणी बायको

खूप खूप वर्षांपूर्वी प्राचीन दिल्ली शहरात छोटूलाल नावाचा एक तरुण वैद्य आणि त्याची सुंदर बायको नंदिनी ही दोघे राहात असत. छोटूलाल भयंकर विसरभोळा होता आणि बिचारा किती प्रयत्न करी पण नेहमी चुकीचे औषध देई किंवा रोग्यांना देण्याच्या औषधामध्ये अदलाबदल अगर गोधळ करी. असे कित्येक वर्षे चालू होते. एखादया साप चावलेल्या माणसाला छोटूलाल खोकल्याचा काढा देई तर एखादया बाईचा घोटा मुरगळल्यावर तिला डोकेदुखीचे औषध देई.

असेच एक दिवस, ऊष्माघाताने पछाडलेला एक तरुण शेतकरी त्याचा सल्ला विचारायला आला. त्याचवेळी एक म्हातारी पण आली. हातावर झाड पडून तिचा हात चेचला होता. छोटूलालने नेहमीच्या विसराळूपणाने त्या शेतकऱ्याचा हात छाटून टाकला आणि त्या म्हातारीला काही गोळ्या दिल्या. या गोळ्या त्याने उष्माघातावर इलाज म्हणून खास बनविलेल्या होत्या. लौकरच झाले काय. की लोक छोटूलालकडे येईनात. त्याच्याकडून औषध घेईनात. तो दिवसेदिवस गरीब होत चालला आणि नंदिनीला सुंदर सुंदर पातळे आणि सोन्याच्या माळा देणे त्याला शक्य होईना. नंदिनी चिडखोर बनली. असंतुष्ट राहू लागली आणि सारखी त्याला डिवचत राहिली.

एका संध्याकाळी छोटूलाल घरी आला तेव्हा त्याच्याजवळ एकदेखील पैसा नव्हता. सकाळी खूप लौकर त्याने घर सोडले होते आणि दिवसभर



वाट पाहिली होती, पण काही उपयोग झाला नाही. त्याच्या दवाखान्याकडे चिटपाखरूही फिरकले नाही.

नंदिनी खूप बडबडली. छोटूलालला रागावली. "मी असं काय पाप केलं म्हणून असा तुमच्यासारखा नवरा मला मिळाला?" ती रडत ओरडत म्हणाली, "आपल्या बायकोला खायलाप्यायला घालणं नवऱ्याचं काम नाही? त्याने तिला सांभाळायला नको? काल रात्री आपण उरल्यासुरल्या वाळलेल्या चपात्या आणि आमटी संपवली. घरात खायला अन्नाचा कणही नाही. नाहीतरी आपण भिकारीच बनलो आहो. जा आणि मागा भीक."

बोलता बोलता ती ओक्साबोक्शी रडू लागली आणि तिने धाडकन दार बंद केले.

छोटूलालने शरमेने मान खाली घातली. त्याने पायाची चाळवाचाळव केली, दाराकडे बघितले. आणि निराशेने म्हणाला, "नंदिनी, कृपा करून थोडी तरी हास ग! तुझी इच्छाच असेल तर मी जातो आणि भीक मागतो. पण जाऊ कुठे तेवढं तरी सांग."

नंदिनीने आपले डोळे पुसले आणि चेहऱ्यावर हास्याची एक फिकट लकेर उमटवली. ती म्हणाली, "जा राजाकडे, आणि काहीही मागा, तो खुशीत असेल तर तुमची विनंती ऐकेल."

आणि मग छोटूलालने राजवाडयाचा रस्ता धरला. राजवाडयाच्या दरवाजावर निलगिरीच्या झाडासारखे, ताठ दिसणारे दोन पहारेकरी उभे होते. त्यांच्या अंगावर सोनेरी नक्षीकाम केलेला गणवेश होता. हातात नंग्या चमकत्या तलवारी होत्या आणि ते महाभयंकर दिसत होते. पण छोटूलाल धिटाईने त्यांच्यापुढून आत गेला. राजा आपल्या रत्नखचित सिंहासनावर बसला होता. त्याच्या दोन्ही बाजूस त्याचे दरबारी आणि मंत्री बसले होते.

छोटूलालने राजाला मोठया आदराने त्रिवार मुजरा केला. मग सगळा धीर एकवटून तो म्हणाला, 'महाराज, कृपा करून काहीतरी दया.'

राजाला गंमत वाटली. तो हसून म्हणाला. 'तुला नेमकं काय हवं आहे?'

छोटूलाल पार गोंधळून गेला. त्याच्या बायकोने काय मागून घ्यायचे ते

त्याला कुठे सांगितले होते? फक्त म्हणाली होती. 'काहीही मागा,' तेव्हा तो पुन्हा तेच म्हणाला, "काहीही दया महाराज."

राजाने आपल्या मंत्र्याकडे बघितले आणि हुकूम सोडला. 'दुसऱ्या कुणालाही नको असलेला जमिनीचा एक तुकडा या माणसाला द्या.'

छोटूलाल घरी आला. परतीच्या वाटेवर तो मजेत गात होता. आपल्या बायकोकडे धावत घाईघाईने येत तो ओरडून म्हणाला, "बघ, राजा किती उदार आणि दयाळू आहे. माझी विनंती त्याने मानली. दुसऱ्या कुणालाही नको असलेली जमीन त्याने मला दिली."

नंदिनीने रागारागाने केस उपटले. पण ती काय करणार? राग थोडा ओसरल्यावर तिने छोटूलालला हाक मारली आणि राजाने दिलेली जमीन बघायला ती दोघे निघाली. जमिनीचा तो तुकडा बराच मोठा होता. चिकार झाडेझुडपे तेथे वाढलेली होती. आणि सगळ्याभर असंख्य दगडधोंडे विखुरलेले होते.

नंदिनीला धक्काच बसला. ही जमीन साफ कशी करणार. नांगरणीला योग्य कशी बनविणार आणि मग त्यात बी तरी केव्हा पेरणार? पण नंदिनीला चटकन युक्ती सुचली नाही असे कधी झालेच नाही. नवऱ्याकडे वळून तिने सांगितले. 'मी जसं करीन तसं करा. हुबेहूब माझी नक्कल. का ते मात्र विचारू नका.' मग खाली वाकून ती जमिनीला अगदी डोळे लावून काहीतरी शोधीत फिरू लागली. छोटूलालही तसेच करू लागला. ती दोघेही सावकाश चालत होती. कमरा वाकलेल्या आणि डोळे जमिनीला खिळलेले.

तेथून एक चोरांची टोळी घोड्यावर बसून जात होती. छोटूलाल आणि त्याची बायको काहीतरी शोधण्यात गुंतलेली पाहून चोरांचा नाईक घोड्यावरून उतरून नंदिनीला म्हणाला, 'तुम्ही काय शोधता, तुमचं काही हरवलं आहे का?'

नंदिनी दचकली. छे. छे. माझे काहीच हरवलेले नाही. काहीच नाही. ती गडबडीने म्हणाली, जणू काही चोरांच्या नायकाने आपल्या जमिनीपासून दूर दूर जावे म्हणून तिचा आटापिटा चालला होता.

चोराला त्यामुळे जास्तच संशय आला. नंदिनी काय शोधते आहे ते जाणून



घेण्याचा चंग बांधला. त्याने तिला प्रश्न विचारून भंडावून सोडले. तेव्हा शेवटी नंदिनीने त्याला एका बाजूला नेऊन हळू आवाजात सांगितले, "मी तुला गुपित काय ते सांगते पण ते दुसऱ्या कुणाला सांगणार नाही असं मला वचन दे." हे बघ, माझे आजोबा काल वारले. मरायच्या थोडाच वेळ आधी ते मला म्हणाले, "या शेतात मी सोन्याने भरलेल्या तीन पेट्या पुरून ठेवल्या आहेत आणि त्याच पेट्या आम्ही शोधत आहोत. पण हे पाहा, दुसऱ्या कुणालासुद्धा हे सांगू नकोस हं."

चोरांच्या नायकाने हे गुपित न फोडण्याचे वचन दिले आणि तिथून तो निघाला. थोड्याच वेळाने छोटूलाल बायकोबरोबर घरी गेला. नंदिनी हसत होती. रस्ताभर नाचत, गात होती. तिला अचानकपणे इतक्या आनंदात पाहून छोटूलालला फार आश्चर्य वाटले.

दुसऱ्या दिवशी छोटूलाल आणि नंदिनी आपल्या शेतावर आली. जमिनीचा तो तुकडा ओळखता देखील येत नव्हता. जमीन उत्तम खणून काढलेली होती. झाडेझुडपे उपटलेली होती. दगडधोंडे काढून टाकले होते. नंदिनीने आनंदाने टाळ्या पिटल्या. "माझी तीन सोन्याच्या पेट्यांची थाप लागू पडली म्हणायची! हे लोक चांगलेच बनले. सोनं शोधून काढण्यासाठी त्यांनी हे सगळं केलं आणि आपली मेहनत वाचली. आता आपलं काम येवढंच की या उकरलेल्या जमिनीत गहू आणि मक्याचं बी आणून पेरायचं."

मग नंदिनीने बी बियाणं विकत घेण्यासाठी सावकाराकडून कर्ज काढले. तिने आणि छोटूलालने बी पेरले. खत घातले, शेताची मशागत केली, पाणी दिले. आणि थोड्याच महिन्यांनंतर शेत फुलून आले. आता ते श्रीमंत झाले. खायला प्यायला भरपूर होते. राहायला सोयिस्कर, मोठे घर होते. आणि सुंदर सुंदर साड्या आणि सोन्याचे दागिनेही असे भरपूर होते की नंदिनी नेहमी खूष असायची. पण चोरांचा नाईक मात्र आपली फजिती विसरला नव्हता. तो अजून घुश्शात होता. सूड उगवण्याची संधी केव्हा मिळते म्हणून तो वाट पाहात होता.

एका रात्री नंदिनी आणि छोटूलाल झोपायच्या विचारात होते येवढ्यात चोरांचा नाईक चोरपावलाने घरात शिरून पडद्यामागे लपला. पण समोरच्या



भिंतीवर त्याची सावली पडली आणि नंदिनीने त्याला ओळखले. तिने एका भांड्यात काचेचे तुकडे आणि गंजलेले खिळे भरले आणि वर बर्फीचा थर रचला. नंतर तिने हळूच नवऱ्याच्या कानात सांगितले की, 'मला पाच मिनिटांनी हाक मारा आणि मी आपला सगळा पैसा कुठे ठेवला आहे ते मोठ्याने विचारा.'

काही मिनिटांनंतर छोटूलाल झोपण्याच्या खोलीत आला आणि मोठ्याने विचारू लागला, "अग ए आपला सगळा पैसा कुठे ठेवलास? नीट सुरक्षित ठेवला आहेस ना?

"तुम्ही काही काळजी करू नका." नंदिनी म्हणाली. "मी किती हुशार आणि धोरणी आहे ते तुम्हांला माहीत नाही का? आपला पैसा अगदी सुखरूप आहे. मी तो एका भांड्यात लपवला आहे आणि वर बर्फीचा थर दिला आहे. माझी ही पैसा लपवायची जागा कुणालासुद्धा सापडणार नाही." मग नंदिनीने दिव्याला फुंकर घातली आणि ती झोपी गेली.

पडदयामागे लपलेला चोर आपल्याशीच हसला. आता या बाईवर चांगला सूड उगवू आपण. तो वीस मिनिटे थांबला. आता छोटूलाल घोरू लागला होता. ती दोघेही गाढ झोपली. नंदिनीचेही श्वास घेणे आता स्पष्ट ऐकू येत होते. ती झोपली आहेत, याची खात्री झाल्यावर चोरांचा नाईक जेवणघरात लपतछपत गेला आणि पटकन बर्फीचे भांडे उचलून मुकाटयाने घराबाहेर पडला.

धावत पळत आपल्या साथीदारांकडे जाऊन तो म्हणाला, "या भांडयात, बर्फीच्या थराखाली काय आहे पाहा – छोटूलाल आणि नंदिनीने जमविलेला पैसान् पैसा." चोरांनी ते ऐकल्याबरोबर भांडयावर झडप घातली. उतावीळपणे त्यांनी हातात आलेली बर्फी फेकून दिली. तळाशी असलेला पैसा आणि दागिने घ्यायला ते हपापले होते. पण त्यांच्या हाती आले फक्त काचांचे तुकडे! त्यांनी त्यांचे हात कापले आणि गंजलेले खिळे त्यांच्या बोटांत घुसले. हात रक्तबंबाळ झालेले, उतावीळपणे फेकून दिलेली बर्फी चिखलात मिसळली होती त्यामुळे तीही खायला मिळाली नाही. अशा अवस्थेत त्यांनी पुन्हा एकदा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली.

एका आठवडयानंतरची गोष्ट. रात्रीचा अंधार पडू लागला होता. एकाएकी



नंदिनीला बाहेर कसला तरी आवाज ऐकू आला. तिने चोरांच्या नायकाचा आवाज ओळखला. हलकेच चवड्यांवर चालत जाऊन तिने कानोसा घेतला. तिला त्यांचा बेत समजला. तो म्हणजे ते सगळे चोर एकापाठोपाठ एक खिडकीतून चढून येणार होते. तिच्या झोपायच्या खोलीत! आणि तिला व छोटूलालला बांधून ठेवून त्यांच्या तोंडात बोळे कोंबून घरातली सगळी मौल्यवान चीजवस्तू चोरून नेणार होते. नाईक मोठ्या गर्वाने म्हणाला, "नंदिनीसाठी मी एक चांगला भक्कम दोर आणणार आहे म्हणजे आपली आठवण ती सहजासहजी विसरणार नाही."

नंदिनी सैपाकघरात गेली आणि एक धारदार चाकू घेऊन आली. मग ती जाऊन उभी राहिली खिडकीच्या मागे. झोपडीच्या भिंतीलगत एक झाड वाढलेले होते. लौकरच त्याच्या पानांची सळसळ तिला ऐकू आली, एक डोकं खिडकीतून आत घुसले, एखादा साप सळसळावा तशी सफाईने नंदिनीने ते पुढे आलेले नाक छाटले. डोके ताबडतोब मागे घेण्यात आले. चोराने खाली उडी टाकली आणि आपल्या नायकाला, ते रक्तबंबाळ नाक दाखवले, नाईक म्हणाला, "अंधारात एखादया अणुकुचीदार दगडावर आपटला असशील झालं." आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी नायकाने स्वतः खिडकीत चढून जाण्याचे ठरविले. त्याचा चेहरा उघड्या खिडकीत दिसला मात्र. नंदिनीने पुन्हा घाव घातला आणि त्याचे नाक तोडले. नाईक आपले रक्तबंबाळ नाक हाती धरून खाली उतरला आणि दुःखाने थयथय नाचू लागला. 'नंदिनीचा सूड उगवल्या-शिवाय अन्नाच्या कणालाही स्पर्श करणार नाही.' अशी त्याने प्रतिज्ञा केली.

वसंत ऋतु ओसरला आणि उन्हाळा सुरू झाला. दिवस रखरखीत होते. तापत होतेपण संध्याकाळी थंड वाऱ्याच्या सुखद झुळुकी वाहात असत. मंद चांदण्यात आणि चमचमणाऱ्या ताऱ्याच्या संगतीत नंदिनी आणि छोटूलालने बागेत मोकळ्यावर झोपायला सुरुवात केली.

दोन रात्री अशाच गेल्या. तिसऱ्या रात्री नंदिनीला स्वप्न पडले की, आपण उंटावर स्वार झालो आहो. तिच्यापुढे दुसऱ्या उंटावर होता छोटूलाल. दूरवर माडाची झाडे होती. सुंदर बागा होत्या. एक देखणा राजपुत्र भरधाव घोडा





फेकीत तिच्याचकडे येत होता. त्याने एक मौल्यवान चंदेरी–सोनेरी साडी आणि चमकणारी रत्ने बसवलेला मोठा थोरला सोन्याचा मुकूट तिच्यापुढे धरला. या भेटी स्वीकारण्यासाठी नंदिनीने हात पुढे केला आणि ती एका धक्क्याने जागी झाली.

तिने जागी होऊन पाहयले आणि काय आश्चर्य ? ती उंटावर स्वार झालेली नव्हतीच मुळी पण चार चोर बिछान्यासकट तिची खाट उचलून नेत होते आणि बाकीचे चोर पुढे चालत होते. 'अरे देवा.' नंदिनीला समजले "या वेळी मात्र मी खरोखरीच यांच्या तावडीत सापडले. मला आता हे कुठे घेऊन जाणार आहेत आणि हे माझे काय करणार आहेत, कोण जाणे. माझ्यावर ते फारशी दया करतील ही आशाच बाळगायला नको.

नंदिनीच्या मनात हे विचार येत होते तेवढ्यात एक चोर म्हणाला, "काय वजनदार बाई आहे ही. माझे खांदे लागले दुखायला. आपण आता थोडा वेळ थांबून विश्रांती घेऊ या. एखादी डुलकी घेऊ या. मग पुन्हा पुढला आपला प्रवास चालू करू." सर्वांनाच हे पसंत पडले. आणि एका वडाच्या झाडाजवळ आल्यावर त्यांनी खाट खाली ठेवली. झाडाच्या जाडजूड बुंध्याला टेकताच त्यांना झोप लागली. नंदिनीने बिछान्यावरची चादर अशी काही पसरली की जणू कुणी तिथे झोपलेलेच आहेसे वाटावे. मग ती हळूच खाटेवरून उठली आणि वडाच्या झाडावर चढली.

सुदैवाने झाडाची पाने मोठी होती आणि फांद्या खाली लोंबत होत्या. त्यामुळे नंदिनीला लपायला चांगलीच जागा मिळाली. ती झाडाच्या एका फांदीवर आरामात बसली आणि खाली झोपलेल्या चोरांकडे तिने नजर लावली. अचानक आपली सुटका करून घेण्याची एक नामी युक्ती तिला सुचली. तिने आपला चेहरा काळ्या शालीने झाकून टाकला आणि आपले हात झोपायच्या पांढऱ्या पोशाखात लपवले. मग मोठमोठ्याने किंचाळत आणि वेडेवाकडे आवाज काढीत तिने आपले हात जोरजोराने हालवायला सुरुवात केली.

चोर जागे झाले आणि भीतीने आजूबाजूला पाहू लागले. रात्रीच्या शांत स्तब्ध वातावरणात एक भुताटकीची किंकाळी घुमली. चोरांनी वर बघितले.

काळ्या तोंडाचा आणि पांढऱ्या पंख्यासारख्या हाताचा एक विचित्र प्राणी झाडावरून त्यांच्याकडे रोखून पाहात होता. "बाप रे! हे या झाडावर राहणारं भूत असणार. आपण त्याला त्रास दिला म्हणून ते रागावलं असावं." ते पुटपुटले. आणि कसेबसे धडपडत उठून मागे वळूनही न पाहता पाय घेऊन जातील तितक्या लांब त्यांनी धूम ठोकली.

नंदिनीला हसू आवरेना. तिने आपल्या सर्व वस्तू गोळा केल्या आणि आता चोर यापुढे आपल्या वाटेला कधीच जाणार नाहीत या खात्रीने आपल्याशीच हासत ती आनंदाने घरी जायला निघाली.



मुद्रक : जे. के. ऑफसेट प्रिंटर्स, नांगलोई, दिल्ली – 110041